या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २७ ऑगस्ट २०२४ | अंक२६१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# माणूस सागर बंगल्याची पायरी चढल्यावर परत येतच नाही, काय निंबू-मिरची: मनोज जरांगे नेमके काय बोलले

## त्या दीड-दोन हजारात काही होणार नाही

सगळं राज्य आमचं आहे. त्यांना फक्त भुजबळ लागतो. हा जडी बुटीवाला सागर बंगल्यावर लागतो. पण आम्ही सगळ्यांना आमचं समजतो. आम्ही माणसं आणि विभाग यात भेदभाव करत नाही. पीकविमा हाच बाबा शेतकऱ्यांना देत नाही. लाडकी बहीण योजनेचे पैसे फडणवीस यांनी त्यांची नागपूरमधील जमीन विकून दिले नाहीत. ते पैसे आमचेच आहे. परंतु त्या दीड दोन हजाराने आमचे काहीच भागणार नाही. दिवाळीत आनंदाचा शिधा देताय, पण डाळीत कीडे असतात, तेलही खराब असते. सत्तेची एवढीही मस्ती असू नये, असा टोला मनोज जरांगे यांनी फडणवीस यांना लावला.



विधानसभा निवडणुकीतील डावपेच आम्ही सांगणार नाही. जर आरक्षण दिले नाही तर सागर बंगल्यावर जाणार आहोत. अधिकाऱ्यांना सागर बंगल्यावाला बाबा व्हॅलीडीटी देऊ देत नाही. त्यांना नीट करण्याचे औषध फक्त मराठ्यांकडे आहे. त्या सगळ्यांना मी नीट करतो. परंतु माणूस सागर बंगल्याची पायरी चढला की परतच येत नाही. हा बाबा काय लिंबू मिरची देतो कळत नाही, असा हल्ला मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता केला. फडणवीस नाहक धनगरांना मराठ्यांच्या अंगावर घालत आहे. भुजबळांचे ऐकून धनगरांनी मराठ्यांच्या अंगावर जाऊ नये. भुजबळ यांचे ऐकून वाद अंगावर घेऊ नये. सत्ता यांची येईल पण आपल्या वाटेला फक्त केसेस येतील. मराठवाड्यात उद्योग उभे करायला सरकारला रोग आला का? असा सवाल जरांगे यांनी केला. आमच्या शेतीमालाला भाव द्या. तुमच्या कर्जमुक्तीची आम्हाला गरज नाही. कामगार, गरीब, वंचित यांचे प्रश्न सोडवा. गोरगरिबांनी विधानसभेत जावे हिच माझी इच्छा आहे. गरिबांना निवडून द्या, त्यांचा धुराळाच काढतो, असे आवाहन मतदारांना जरांगे यांनी केले. मराठवाड्यात उद्योग आले नाही, त्यावरुन त्यांनी राजकारण्यांना घेरले. राजकोट – सिंधुदुर्ग येथे उभारलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य शिल्प आज कोसळले. त्यावर मनोज जरांगे यांनी सरकारला घेरले. छत्रपती संभाजीराजे यांनी १२ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिलेले पत्र देखील पोस्ट केले आहे. छत्रपती संभाजीराजे यांनी तेव्हाच हा पुतळा बदलण्याची मागणी केली असल्याचे उघडकीस आले आहे. तथापी, छत्रपती संभाजीराजे यांच्या या पत्रावर पंतप्रधान कार्यालयाने निराशाजनक भूमिका घेतल्यानेच आजचा दुर्दैवी प्रसंग ओढवला.

## कृषी महोत्सवातील पशुप्रदर्शनाला पशुपालकांचा चांगला प्रतिसाद



बीड (प्रतिनिधी)

बीड, दि. 26 : राज्यस्तरीय कृषी महोत्सवातील प्रशुप्रदर्शनाला पशुपालकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.सध्या परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव सुरू आहे यामध्ये पशुप्रदर्शनचे मोठे दालन आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली पशु प्रदर्शन भरविण्यात आले आहे. उद्या सोमवारी महोत्सवाचा शेवटचा आणि समारोपाचा दिवस आहे.

पशुप्रदर्शनामध्ये प्रामुख्याने गाय वर्गांच्या विविध अकरा जाती त्यामध्ये लाल कंधारी, देवणी, पुंगणुर, खिल्लार, डांगी, गौवळावू ,संकरित एच एफ क्रॉस, संकरित जर्सी ,कॉंक्रेज गायी आहेत. म्हैस वर्गामध्ये मुरहा, मेहसाना, जाफराबादी, पंढरपुरी, मराठवाडी, नागपुरी, इत्यादी म्हैस पशुधनाने सहभागी आहेत. तसेच शेळी वर्गामध्ये उस्मानाबादी शेळी व बीटल शेळी व मेंढी वर्गामध्ये डेकनी व माडग्याळी मेंढी, कुकुट पक्षांमध्ये गिरीराज वनराज कावेरी व कडकनाथ व अश्वमध्ये काठीयावाडी ,मारवाडी, सिंधी, पंजाब नुकरा तर श्वानांमध्ये लेब्राडोर, जर्मन शेफर्ड, पामेरियन ,मुधोळ हंट, गोल्डन रिट्रायव्हर, कारवान ,डॉबरमॅन इत्यादी श्वान वर्गाने सहभाग नोंदवला आहे. सदरील पशुप्रदर्शनासाठी पशुपालक हे नागपूर, नाशिक, सोलापूर ,नांदेड, लातूर इत्यादी विविध भागातून आले सदरील पशुप्रदर्शनास नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला पशुप्रदर्शन कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. प्रकाश लक्ष्मणराव आघाव पशुधन विकास अधिकारी परळी वैजनाथ हे कामकाज पाहत आहेत.

## बीड शहरातील व्यापाऱ्यांच्या समस्याना.अजितदादा पवारांसमोर मांडणार

### डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आश्वासन; बीडमध्ये व्यापारी महासंघाची वार्षिक सभा उत्साहात

बीड (प्रतिनिधी)

दि.२६ : शहरातील नागरिकांसह व्यापाऱ्यांच्या समस्या बीडमध्ये येत असलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर आपण मांडणार आहे. त्यांच्या माध्यमातून व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात प्रयत्न करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. २४ व्या वर्षात पदार्पण करत असलेल्या बीड जिल्हा व्यापारी महासंघाची वार्षिक सभा बीडमध्ये रविवारी (दि.२५) सायंकाळी १० वाजता उत्साहात पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरुण डाके, व्यापारी




महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष अशोक शेटे, बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश कानगावकर, प्रकाश कोटेचा, तुकाराम साळुंके आदींची उपस्थिती होती. व्यापारी महासंघाच्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी नगरसेवक भास्कर जाधव यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, २३ वर्ष व्यापारी संघटनेचे यशस्वीपणे काम सुरू आहे. शहरातील व्यापाऱ्यांना अधिकाधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. भाजी मंडईत स्वच्छता करण्याच्या सूचना स्वच्छता निरीक्षकांना दिल्या आहेत. तेथील पाण्याच्या टाकीचा प्रश्न सोडविण्यासाठी सामूहिक प्रयत्न गरजेचा आहे. दुरवस्था झालेल्या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकला जाईल. तसेच, व्यापारी संकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत नगरपरिषद प्रशासनाकडे पाठपुरावा करू, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. प्रास्ताविक करताना भास्कर जाधव यांनी व्यापाऱ्यांच्या समस्या मांडल्या. सूत्रसंचलन श्री. जाधव यांनी केले. आभार तुकाराम साळुंके यांनी मानले. यावेळी व्यापारी महासंघाच्या पदाधिकारी, सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



बीड शहरातील धांडे गल्ली येथील सामाजिक कार्यकर्ते अँड विजयकुमार धांडे यांनी आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गटात प्रवेश केला यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि युवा नेते रोहित क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले यावेळी ज्येष्ठ नगरसेवक नरसिंह नाईकवाडे, इंजि संतोष पवार हेही उपस्थित होते.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत ट्रेनी शिक्षक निवडीत सावळा गोंधळ

### पुरेसा वेळ दिला नसल्यामुळे भरती रद्द करण्याची इच्छुक उमेदवाराकडून मागणी

पाटोदा प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत जिल्हा परिषद शाळेत प्रत्येकी एक अशी शिकाऊ प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षक व गटशिक्षण कार्यालयात एक संगणक ऑपरेटर म्हणून अटी व शर्तीच्या अधीन राहून निवड करावयाची आहे अशी जाहिरात क्रमांक 01/24 दि. 21 ऑगस्ट 2024 आणि या प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये तालुक्यातले एकूण 180 पदाकरिता ट्रेनी शिक्षक व गटशिक्षण कार्यालयात एक संगणक ऑपरेटर साठी अर्ज करण्याचा कालावधी 21 ऑगस्ट 2024 पासून 25 सप्टेंबर 2024 पर्यंत होता. इच्छुक उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करण्याचे जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आले होते. दिनांक 23 ऑगस्ट 2024 रोजी अचानकपणे रात्री उशिरा या जाहिरातीमध्ये बदल करून 24 ऑगस्ट 2024 पर्यंत दुपारी बारा वाजेपर्यंत जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापक यांच्याकडे ऑफलाईन अर्ज सादर करण्याचे गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले. यामध्ये बदल केलेली पत्राची प्रसिद्धी व्यवस्थितरित्या झाली नाही अथवा इच्छुक उमेदवारांपर्यंत ही माहिती पोहचली नाही त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवार हे फॉर्म भरण्यापासून वंचित राहिले. संबंधित मुख्याध्यापक यांनीही गाव लेवलवर आपलं जवळच्या मित्रांना, पदाधिकारी, आपले संबंध जपावेत म्हणून, नातेवाईक यांना कळवून त्यांचेच जवळच्या लोकांचे अर्ज भरून घेतले असे काही इच्छुक उमेदवारांचे म्हणणे आहे. अनेक शाळा वरील मुख्याध्यापकांनी तर अनेकांचे अर्ज स्वीकारले नाही तिथे फक्त एकच अर्ज स्वीकारला. आज गटशिक्षणाधिकारी कार्यालयांमध्ये सबंध तालुक्यातील अनेक गावातून तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारीचे निरसन झाल्यावरच संबंधित भरती करण्यात यावी असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ही



मुळात युवकांसाठी योजना सरकारने जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत अनेक ठिकाणी महिलांचे अर्ज घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयानुसार या योजना अंतर्गत महिलांची निवड करता येत नाही ही योजना फक्त युवकांसाठी आहे याविषयी गटशिक्षणाधिकारी बोंदार्डे साहेब यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले की आम्हाला वरिष्ठांनी जसे सांगितले आहे तसे आम्ही करतो असे म्हणून त्यांनी याविषयी उत्तर देण्यात टाळले. शासन निर्णयाचे अवलोकन करून संबंध तालुक्यातील भरती स्थगित करून अर्ज करण्यासाठी आठ दिवसाचा वेळ देऊन भरती पुन्हा करण्यात यावी असे तालुक्यातील तक्रारदाराचे मत आहे.

# उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची जनसन्मान यात्रा बीड मतदारसंघात येणार

## जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांची पत्रकार परिषदेत माहिती



बीड (प्रतिनिधी) दि.२६ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेला सर्व सामान्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. ही यात्रा बीड शहरात येत असून राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसन्मान यात्रेची सभा शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे गुरूवारी (दि.२९) होणार आहे, याची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी दिली. बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात नियोजनाची सोमवारी बैठक पार पडली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ॲड.चव्हाण हे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बबनराव गवते, मोईन मास्टर, फारूक पटेल, डॉ.सारिका क्षीरसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड.प्रज्ञाताई खोसरे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, ॲड.राजेंद्र राऊत, नगरसेवक शुभम धूत, अल्पसंख्याक महिला आघाडी जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष इंजि.अजिंक्य आनेराव, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना ॲड.राजेश्वर चव्हाण म्हणाले की, ना.अजितदादा पवार यांनी सर्व समाजासाठी कोणकोणत्या अभिनव योजना देऊ केल्या, त्याची माहिती देण्यासाठी जनसन्मान यात्रा काढली आहे. त्यांच्या जनसन्मान यात्रेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. माझी लाडकी बहिण योजनेतून राज्यातील करोडो महिलांच्या बँक खात्यात दोन महिन्यांची रक्कम जमा झाली आहे. याव्यतिरिक्त मुलींच्या उच्च शिक्षणाचा १०० टक्के खर्च सरकार उचलणार आहे. ५२ लाख कुटुंबांना वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. तसेच शेतकरी बांधवांसाठी वीज बिल माफ केले आहे. विद्यार्थांना आणि पदवीधर तरुणांना प्रशिक्षण भत्ता देण्यात येत हे. यासह अनेक योजना राबविण्यात येणार आहे. याबद्दलची माहिती नागरिकांना देण्यासाठी अजितदादा यांनी जनसन्मान यात्रा काढली असून बीड मतदारसंघात देखील ही जनसन्मान यात्रा येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी दिली. राज्यभरात सुरू असलेली जनसन्मान यात्रा बीड मतदारसंघात गुरुवार, दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी, सकाळी ९.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दाखल होत असून या यात्रेची सभा आयोजित करण्यात आली असून उपमुख्यमंत्री अजित पवार विविध घटकातील नागरिक, महिला भगिणींशी संवाद साधणार आहेत. यावेळी नगर रोडवरून दुचाकी रॅली देखील काढण्यात येणार आहे. त्यांनतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येईल. ठिकठिकाणी अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच विविध ठिकाणी असल्याचे भव्य स्वागत करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी सांगितले.

### यात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी : डॉ.योगेश क्षीरसागर

कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्यासह पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, खा.प्रफुल्ल पटेल, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत. यात्रेच्या भव्यदिव्य स्वागताची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

# खा.वसंतराव बळवंतराव पाटील चव्हाण यांचे निधन

## नांदेड जिल्ह्यावर शोककळा; आज नायगाव येथे होणार शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट**

नांदेड : नांदेड जिल्ह्याचे काँग्रेसचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. परवा मध्यरात्री त्यांची तब्येत अचानकपणे बिघडली. त्यानंतर काल पहाटे ३ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. वसंतराव चव्हाण यांच्या निधनाने नांदेड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. वंसतराव पाटील चव्हाण यांची राजकीय कारकीर्द :- जन्म - 15 ऑगस्ट 1954- 1987 साली नायगाव ग्राम पंचायतीचे सरपंच, 24 वर्ष सरपंच 1990 - जिल्हा परिषद सदस्य 2002 विधान परिषद सदस्य (राष्ट्रवादी) 2009 - विधानसभा सदस्य - अपक्ष 2014 - विधानसभय सदस्य -काँगेस 2024 - लोकसभा सदस्य - काँगेस गेल्या काही दिवसांपूर्वी खासदार वसंतराव चव्हाण यांची प्रकृती अचानक खालावली होती. त्यामुळं त्यांना तातडीनं हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. वसंतराव चव्हाण यांना श्वास घेण्यास अडचण होत असल्यामुळं त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. तसंच, त्यांना लो बीपीचाही त्रास होत होता.



हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. अखेर परवा मध्यरात्री त्यांची तब्येत अचानकपणे बिघडली आणि त्यांची प्राणज्योत मालवली. नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात गेल्या दोन दशकांपासून प्रतिनिधित्व केल्यानंतर वसंतराव चव्हाण यांनी काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवली होती. नुकत्याच झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसकडून त्यांनी निवडणूक लढवली होती. तत्कालीन खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा त्यांनी पराभव केला होता. तसंच, अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेससाठी नांदेड मधील हा विजय महत्वपूर्ण होता. खासदार होण्याआधी वसंतराव चव्हाण महाराष्ट्र विधानसभेवर अपक्ष आमदार म्हणून निवडून गेले होते.त्यांनी नायगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलं होतं. तसंच, वसंतराव चव्हाण यांनी २०१४ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. याशिवाय, मे २०१४ मध्ये त्यांची विधानसभेच्या लोकलेखा समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. ते जनता हायस्कूलचे अध्यक्षही होते.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांची आज राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. यावेळी त्यांनी विधानभवनात निवडणूक अधिकाऱ्यांकडून पत्र स्वीकारले. बिनविरोध निवड झाल्याबद्दल पक्षाचे कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी पक्षाचे सहकोषाध्यक्ष संजय बोरगे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## वाढदिवस अभिष्टचिंतन CA कदम साहेब....!

बीड जिल्ह्यातील, माजलगाव तालुक्यातील साळेगाव सारख्या एका छोट्या गावातून शिक्षण घेऊन अतिशय प्रामाणिक कष्ट आणि आपल्या बुद्धीच्या जोरावर सनदी लेखापाल (सी.ए.) क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा आज वाढदिवस. शैक्षणिक तसेच सामाजिक देखील कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व म्हणजे CA कदम साहेब. आपला शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याचा आलेख असाच उत्तुंग अग्रेसर होत राहो, हीच सदिच्छा.




सर तुमच्या बद्दल बोलाव तेवढं कमीच आहे, तुमच्यासारखा दिलदार मित्र आमच्या आयुष्यामध्ये येणं ही एक भाग्याची गोष्ट. वेळ कोणतीही असो वेळेला कायम पाठीशी राहून उत्तम मार्गदर्शन करणार दिलदार व्यक्तिमत्व म्हणजे आपण. कोण कृष्ण कोण सुदामा आजून काही समजले नाही; वेळेला कृष्ण होऊन साथ दिली तर कधी सुदामा होऊन मैत्रीची भूख भागवली...... सर आपलं येणार आयुष्य सुख, समृद्धी आणि भरभराटीचे जावो हीच आई तुळजाभवानी व नगद नारायण महाराज यांच्या चरणी प्रार्थना.

आपला शुभचिंतक :-
सुदर्शन गवते पाटील.

# मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांची ८ सप्टेंबर रोजी परळी येथे घोंगडी बैठक

## पूर्वनियोजन बैठकीस सकल मराठा समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी (वार्ताहर) मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मतदार संघनिहाय घोंगडी बैठका होत आहेत. रविवार दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी परळी येथे घोंगडी बैठक होणार आहे. त्यासाठी पूर्वतयारी ची बैठक श्रद्धा मंगल कार्यालय, परळी वैजनाथ येथे पार पडली. या बैठकीमध्ये घोंगडी बैठकीच्या तयारीसाठी ज्या प्रकारे नियोजन करावे लागणार आहे त्याबद्दल समाज बांधवांनी विस्तारित चर्चा व मंथन केले. दरम्यान परळी मतदारसंघातील समाजातील लहान थोर, वडीलधारी मंडळी,महिला यांनी सहभागी व्हावे तसेच या विषयी प्रचार प्रसार करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या असून ही घोंगडी बैठक समाजाला दिशा देणारी असेल असा विश्वास या प्रसंगी समाज बांधवांनी व्यक्त केला. पूर्वनीयोजन बैठकीचे आयोजन श्रद्धा मंगल कार्यालय पावर हाऊस समोर करण्यात आले होते. परळी मतदार संघातील मराठा समाजातील बांधव मोठ्या संख्येने या बैठकीला उत्स्फूर्तपने उपस्थित होते.



# मुख्यमंत्र्यांनी नागपुर येथील हिवाळी अधिवेशनात शासकीय कर्मचार्यांना दिलेला शब्द पाळावा नसता २९ ऑगस्ट रोजीच्या सर्व शासकीय कर्मचारी संघटना संपामध्ये उतरणार- राजकुमार साठे

बीड (प्रतिनिधी)- शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागु करण्याचा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनात दिलेला होता तो शब्द पाळावा अन्यथा 29 ऑगस्ट 2024 (गुरुवार) पासून सर्व संघटना मागणीसाठी संपामध्ये उतरणार असल्याचे महाराष्ट्र राज्य स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष राजकुमार साठे, सचिव योगेश कुलकर्णी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातुन मत व्यक्त केलेले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सरळ आणि साधे व्यक्तीमत्व आहे परंतू त्यांचे काही सहकारी हे त्यांना जुनी पेन्शन दिली तर महाराष्ट्र शासनावर ढगफुटी होईल असे सांगतात आणि स्वतः मात्र पेन्शन धारकाप्रमाणे दोन दोन पेन्शनचा लाभ घेतात. शासकीय कर्मचारी कोणतीही आपत्ती असो सहभाग घेतात, आर्थिक मदतही करतात मग या शासकीय कर्मचाऱ्यांना म्हातारपणी पेन्शन देण्यात गैर काय? नोकरी लागल्यापासून शासकीय कर्मचाऱ्यांचे संपुर्ण आयुष्य हे जबाबदारी मध्ये म्हणजे घराचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी, मुलाबाळाचे शिक्षण करण्यात जाते त्या शासकीय कर्मचाऱ्यांना उतारवयात अनेक आजारांना सामोरे जावे लागते अशी संकट असतांना शासनाने पेन्शन बंद करणे योग्य वाटत नाही. यापुर्वी राज्यामध्ये सत्तेवर आलेले सरकारने ज्यामध्ये काँग्रेस पक्ष, आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी कधीही शासकीय कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी भूमिका घेतली नाही उलट कर्मचाऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडविले कर्मचारी आनंदी राहून कामे कशी करील यासाठी प्रयत्न केले. तरी मुख्यमंत्री शिंदे यांनी नागपुर येथील अधिवेशनात शासकीय कर्मचाऱ्यांच्या पेन्शन संबंधीचा प्रश्न मार्गी लावण्याचा शब्द दिला होता तो शब्द पाळावा अन्यथा आम्ही सर्व शासकीय कर्मचारी संघटना या 29 ऑगस्ट 2024 (गुरुवार) पासून सर्व संघटना मागणीसाठी संपामध्ये उतरणार आहोत तो संप आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत चालू ठेवू असे पत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्य स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष राजकुमार साठे, सचिव योगेश कुलकर्णी , सहसचिव नितीन जाधव, कोषाध्यक्ष बहीर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

